म.टा.पू. पान क्र.१

दि. 06/03/2023

(1)

# होळी, धूळवडीसाठी पोलिस सज्ज

म. टा. वृत्तसेवा, वसई

वसईत होळी आणि धूळवडीचा सण पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात येतो. मात्र कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मिरा-भाईंदर वसई-विरार आयुक्तालयातील पोलिस यंत्रणा सज्ज झाली आहे. मद्यपान करून वाहने चालवणाऱ्यांवर नजर असणार आहे.

सोमवारी होळी सणासाठी वसई-विरार तसेच मिरा-भाईंदरवासियांनी उत्साहाने तयारी केली आहे. रात्री होलिकादहनावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांनी ठिकठिकाणी बंदोबस्त तैनात केला आहे. मंगळवारी धूळवडीदिवशी मद्यपान करून वाहने चालवणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. समुद्रकिनाऱ्याजवळ वाहनचालकांचीही तपासणी करण्यात येणार आहे. यासाठी आयुक्तालयाच्या हद्दीतील १६ पोलिस ठाण्याचे अधिकारी, उपनिरीक्षक, सहायक निरीक्षक, बीट मार्शल, पोलिस कर्मचारी यांची करडी नजर असणार आहे. गर्दीच्या ठिकाणी विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

**जूचंद्र गावची एकोप्याची होळी**

वसई तालुक्यातील जूचंद्र गावात यावर्षीही 'एक गाव एक होळी' उत्सव साजरा होणार आहे. होळीची सुरुवात रविवारी कोंबड होळीने झाली. सोमवारी सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. पारंपरिक पद्धतीने बैलगाडीवरून होळीची मिरवणूक काढून विधिवत पूजा केली जाणार आहे. सर्वजण राजकारण बाजूला ठेवून एकोप्याने उत्सवात सहभागी होणार आहेत.

**फुगे, पिशव्यांवर नजर**

मिरा-भाईंदर : मिरा-भाईंदर महापालिकेकडून पाण्याचे फुगे तसेच बंदी असलेल्या प्लास्टिकच्या पिशव्यांची विक्री करणाऱ्या दुकानदारांवर कारवाई केली जात आहे. मागील काही दिवसांत या कारवाईतून २२ हजार रुपयांहून अधिक रकमेचा दंड पालिकेने वसूल केला आहे. प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी घातली असली, तरी नियम धाब्यावर बसून त्यांची विक्री केली जाते. त्यामुळे प्रभाग स्तरावर बंदी असलेल्या प्लास्टिक पिशव्यांची विक्री केली जाते का, याची तपासणी दुकानांमध्ये केली जात आहे.

(2)

## लाच स्वीकारताना वनरक्षकाला अटक

पालघर : वन विभागाकडून भूमिहीन आदिवासींना वाटप करण्यात आलेल्या जमिनीपैकी सहा गुंठे जमीन नावावर करून देण्यासाठी ५० हजार रुपये लाच मांगून, त्यातील २० हजार रु. स्वीकारताना वसई तालुक्यातील मांडवी येथील वनरक्षक रणजीत डोळे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पेल्हार येथे अटक केली. रणजीत डोळे हे वनपरिक्षेत्र कार्यालय मांडवी, ता. वसई येथे वनरक्षक पदावर कार्यरत आहेत. भूमिहीन आदिवासींना वितरित केलेल्या जमिनीपैकी सहा गुंठे जमीन तक्रारदाराच्या नावावर करून देण्यासाठी प्रति गुंठा दीड लाख रु. या बाजारभावाप्रमाणे सहा गुंठे जागेची किंमत नऊ लाख रुपये होती. त्या अनुषंगाने त्या जागेवर बांधकाम करताना कोणतीही कारवाई होऊ नये, यासाठी डोळे यांनी ५० हजार रु. लाच मागितली होती. तक्रारदाराने केलेल्या तक्रारीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने वसई तालुक्यातील पेलहार येथे सापळा रचून डोळे यांना २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना अटक केली. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई सुरू आहे. या कारवाईमध्ये पोलिस उपाधीक्षक नवनाथ जगताप, पोलिस निरीक्षक स्वपन बिश्वास, पोहवा अमित चव्हाण, विलास भोये, संजय सुतार, निशा मांजरेकर, नवनाथ भगत, दीपक सुमडा, योगेश धारणे, पोशी जितेंद्र उमतोल, सखाराम दोडे यांनी सहभाग घेतला.

(3)

# विजेच्या धक्क्याने तरुणाचा मृत्यू

म. टा. वृत्तसेवा, वसई

चोरी रोखण्याच्या उद्देशाने महिला दुकानदाराने लोखंडी ग्रीलमध्ये सोडलेल्या विजेच्या प्रवाहाचा धक्का लागून त्याच परिसरातील रहिवासी तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना नालासोपारा येथे उघडकीस आली आहे. राकेश नरेंद्र शिंदे (१८) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव असून, या प्रकरणी मीरा संजय कांदु (४२) या महिलेवर तुळींज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मोरगाव तलावाजवळील राजाराम आपर्टमेंटमध्ये, तळमजल्यावर मीरा कांदु या महिलेचे किराणा दुकान आहे. या दुकानाच्या पाठीमागील खिडकीतून चोर दुकानात शिरू नये, तिने बाथरूमच्या खिडकीखाली ठेवलेल्या लोखंडी ग्रीलमध्ये विजेचा प्रवाह सोडला होता. मात्र याच भागातील मोरगाव, नगीनदास पाडा येथे राहणाऱ्या राकेश शिंदे या १८ वर्षीय तरुणाला येथे विजेचा धक्का लागला आणि त्यात त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना २५ फेब्रुवारी रोजी घडली होती. प्रथम पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून, तपास केला. त्यावेळी हा सर्व प्रकार उघडकीस आला. त्यानंतर नुकताच या दुकानदार महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

लोकमत पान क्र.5

दि. 06/03/2023

(4)

# नोकरीचे आमिष देऊन महिलेची केली विक्री

## आखाती देशातील एजंटसोबत व्यवहार; दोघांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** परदेशात नोकरीचे प्रलोभन दाखवून आखाती देशातील एजंटला तीन लाखांना विकून एका महिलेची फसवणूक करण्यात आली. याप्रकरणी काशीमीरा पोलिसांनी एका महिलेसह एका पुरुषाला अटक केली आहे.

काशीमीरा पोलिस ठाणे हद्दीतील फिर्यादी महिलेस आखाती भागातील ओमान - मस्कत देशात दरमहा ३० हजार पगारावर घरकामाच्या नोकरीचे प्रलोभन अशरफ मैदू कैवौरा (४६, रा. चैट्टली, ता. चेराळा, कर्नाटक) व नमिता सुनील मालुसरे (४६, रा. हनुमान मंदिराजवळ, घाटकोपर, मुंबई) यांनी दाखवले होते.

ही महिला ओमान - मस्कत देशात कामास गेल्यानंतर तेथील ओमानी एजंटला भेटली. त्यावेळी भारतातील एजंटनी तुला तीन लाख रुपयास विकले असून, आता जे काही काम सांगतील ते करावे लागेल, असे ओमानी एजंटने सांगितल्यावर महिलेस धक्का बसला. भारतात परत जायचे असेल तर दिलेले तीन लाख रुपये परत करावे लागतील, असे एजंटने सांगितले.



### अशी करून घेतली सुटका

■ फसगत झालेल्या त्या महिलेने तिच्या ओमान-मस्कत येथील तिचे ओळखीच्या व्यक्तींना घडलेला प्रकार सांगितला.

■ ओळखीच्या व्यक्तींनी तिला एक लाख ६५ हजार रुपयांची मदत केली. ती रक्कम तिने ओमानी एजंटला देऊन स्वतःची सुटका करून घेत मायदेशी गाठले.

■ भारतात परतल्यावर महिलेने काशीमीरा पोलिस ठाण्यात नमिता व अशरफविरुद्ध फिर्याद दिल्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्यानंतर पोलिस पथकाने तपास करत नमिता व अशरफ यांना १ मार्चला अटक केली आहे.

(5)

# लग्नाचे आमिष; लैंगिक अत्याचार

**नालासोपारा :** लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार केल्याची घटना विरारमध्ये घडली आहे. परिसरात राहणाऱ्या ३० वर्षीय महिलेला बोळींज येथील आरोपी तरुणाने २८ ऑक्टोबर २०१८ ते २२ जानेवारी २०२३ दरम्यान लग्नाचे आमिष दाखवून विरारमधील एका रूमवर नेऊन लैंगिक अत्याचार केला होता. त्यानंतर लग्नास नकार देत पीडित महिलेला शिवीगाळ करत धमकावले होते. दरम्यान, पीडित महिलेने शनिवारी विरार पोलिस ठाण्यात आरोपीविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.

(6)

# अनैसर्गिक अत्याचार

**नालासोपारा :** अवघ्या नऊ वर्षांच्या अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना नालासोपारा येथे घडली आहे. धानिवबाग येथील मुलाला नवीन कपडे शिवण्यासाठी आरोपीने ओळखीच्या शिंप्याकडे नेतो असे त्याच्या आईला सांगत अनैसर्गिक लैंगिक अत्याचार केला. याप्रकरणी पेल्हार पोलिस ठाण्यात आरोपीविरोधात पोक्सोचा गुन्हा दाखल केला आहे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

७) सकाळ पू. पान क्र. ३

दि. 06/03/2023



**वसई :** विरार पूर्वेला वाहतूक पोलिसांकडून बसवर कारवाई करण्यात आली.

# विरारमध्ये बेकायदा वाहनांवर कारवाई

## वाहतूक पोलिसांची मोहीम; १४ रिक्षा, ५८ बसना दणका

वसई, ता. ५ (बातमीदार) : बेकायदा वाहन चालविणाऱ्या १४ रिक्षा तसेच रस्त्याला अडथळा निर्माण करणाऱ्या ५८ बसवर वाहतूक विभागाने कारवाईचा बडगा उगारला आहे. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून ही मोहीम अशीच सुरू राहणार असल्याचे पोलिस निरीक्षक प्रशांत लांघी यांनी स्पष्ट केले.

> रस्त्याच्या कडेला उभी करण्यात येणारी वाहने, तसेच बेकायदेशीर रिक्षांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच शहरातील वाहतूक सुरळीत कशी ठेवता येईल, याबाबत विविध उपाय योजना केल्या जात आहे. यानुसार पुढे देखील बेकायदेशीर वाहने आढळल्यास कारवाई केली जाईल.
> - **प्रशांत लांघी**, पोलिस निरीक्षक

विरार शहरात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असते. याचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना होतो. त्यामुळे वाहतूक पोलिस निरीक्षक प्रशांत लांघी यांच्या मार्गदर्शनाखाली मोहीम हाती घेण्यात आली आहे. यात रात्रीच्या सुमारास बेकायदा रिक्षा चालविणाऱ्या १४ जणांवर कारवाई करण्यात आली. तसेच खासगी बसेस या रस्त्याच्या कडेला उभ्या केल्या जातात. या पार्क केलेल्या बसमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याने या भागात मोठी वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे वाहतूक पोलिसांनी विरार पूर्वेकडील मनवेलपाडा येथे अशा पार्क केलेल्या ५८ बसेसवर दंडात्मक कारवाई केली आहे. वाहतूक पोलिसांनी कारवाईची मोहीम हाती घेतल्याने सर्वसामान्य नागरिकांतून समाधान व्यक्त केले जात आहे.

८) सकाळ पान क्र. ५

## ठाणे कारागृहातून शिजान खानची सुटका

ठाणे, ता. ५ (वार्ताहर) : अभिनेत्री तुनीषा शर्मा आत्महत्या प्रकरणातील संशयित आरोपी अभिनेता शिजान खान याची ठाणे मध्यवर्ती कारागृहातून रविवारी (ता. ५) सुटका करण्यात आली. तब्बल ७० दिवस कारागृहात राहिलेल्या शिजानला वसई न्यायालयाने एक लाखाच्या जातमुचलक्यावर शनिवारी (ता. ४) जामीन मंजूर केला होता. कारागृहाच्या बाहेर त्याची बहीण आणि आई उपस्थित होती.

वसई न्यायालयाने शिजानला जामीन मंजूर केल्यावर न्यायालयीन प्रक्रियेतील मेमो ठाणे मध्यवर्ती कारागृहाला शनिवारी प्राप्त झाला होता. त्यामुळे रविवारी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास त्याची सुटका करण्यात आली. शिजान कारागृहाच्या बाहेर येताच बहीण आणि आईने त्याला मिठी मारून स्वागत केले. लवकरच न्यायालयात शिजानची बाजू मांडण्यात येईल, अशी माहिती त्याच्या बहिणीने दिली.

९) पुण्यनगरी पू. पान क्र. १

# नालासोपाऱ्यातील आगीत दोन जवान जखमी

## पीपीई किटमुळे वाचले प्राण



**नालासोपारा ।** नालासोपारा पूर्वेकडील पंचम पॅलेस, रूम नंबर २०७ मध्ये राहणारे अंबरनाथ लपासी यांच्या घरात रविवारी पहाटे तीन वाजता आग लागली. या आगीत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी बचाव कार्यासाठी गेलेले दोन अग्निशमन दलाचे जवान गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर ओझोन हॉस्पिटल उपचार सुरू आहेत. ही आग नेमकी कशाने लागली हे समजू शकले नाही.

नालासोपारा पूर्वेकडील आचोळे रोड येथील पंचम पॅलेसमधील अंबरनाथ लपासी यांच्या घरात पहाटे ३.४० च्या सुमारास आग लागली. या आगीची माहिती अग्निशमन दलाच्या कार्यालयाला कळवल्यानंतर अवघ्या ५ मिनिटात घटनास्थळी पोहोचली. अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहोचून फायरमन राहुल पाटील व कुणाल तामोरे पाहणी करण्याकरता रूममध्ये दाखल होताच सिलिंडरचा स्फोट होऊन आगीच्या बॅक ड्रॉपमुळे दोघे होरपळले. दोघांनी पीपीई किट घातले असल्याने वाचले. त्यांच्यावर ओझोन हॉस्पिटलात उपचार सुरू आहेत. त्यानंतर कर्मचाऱ्यांनी ४ वाजून ४५ मिनिटांनी आगीवर नियंत्रण मिळवले.

CS CamScanner

Scanned with CamScanner

पुढारी पान क्र.5

दि. 06/03/2023

(10)

# दाराजवळ चप्पल ठेवण्यावरून वादात शेजाऱ्याची हत्या

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरारोड मधील नयानगर भागात एका इमारतीत चप्पल ठेवण्यावरून शेजाऱ्याबरोबर भांडण झाले. झालेल्या भांडणात शेजाऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. यामध्ये नयानगर पोलीस ठाण्यात पती, पत्नी विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिलेला अटक करण्यात आले असून तिचा पती फरार झाला आहे.

मिरारोड, नया नगर येथील अस्मिता डॅफोडिल अपार्टमेंटमध्ये एका किरकोळ कारणावरून भांडणात रूपांतर होऊन आयुष्य कसे उद्ध्वस्त होते याचे उदाहरण आपल्याला पहायला मिळाले. किरकोळ भांडण व राग अनावर झाल्याने एकाचा अनमोल जीव गेला आहे. पॅसेजमध्ये चप्पल ठेवण्यावरून

शेजाऱ्यामध्ये आपापसांत वाद झाला. त्या वादातून दोघांमध्ये हाणामारी झाली. त्या हाणामारीत शेजाऱ्याचा मृत्यू झाला आहे. मृताच्या पत्नीच्या म्हणण्यानुसार, पॅसेजमध्ये चप्पल ठेवण्यावरून वाद झाला, त्याचे नंतर हाणामारीत रूपांतर झाले. भांडणानंतर शेजारी अफसर खत्री घरात येऊन झोपले असता त्यांच्या तोंडातून फेस येत होता. त्याना जवळच्या हैदरी मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, हैदरी चौक येथे नेण्यात आले, तिथे डॉक्टरांनी त्याला दाखल करण्यापूर्वीच मृत घोषित केले. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. नयानगर पोलिस ठाण्याचे पोलीस अधिकारी जिलानी सय्यद यांनी सांगितले की, दाम्पत्य आणि पीडितेचे एकमेकांच्या दार-ाजवळ चप्पल ठेवण्याच्या कारणावरून अनेकदा भांडण झाले आणि अशाच एका वादातून शनिवारी रात्री हाणामारी झाली. अफसर खत्री या भांडणात जखमी झाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, झैनब रुपानी या महिलेला मीरा रोड पूर्व नया नगर येथून अटक करण्यात आली आहे, तर तिचा पती समीर रुपानी हा शेजाऱ्याच्या हत्येप्रकरणी फरार आहे. याप्रकरणी समीर रुपाणी आणि त्यांच्या पत्नीविरुद्ध नयानगर पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

(11)




# विरारमध्ये एका कार्यक्रमात झाली पैशाची उधळण

## व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल

**विरार :** विरार पूर्वेच्या सकवार येथे पार पडलेल्या गुजराती संगीत जलसा कार्यक्रमात मोठया प्रमाणात नोटांची उधळण करण्यात आली आहे. या संदर्भातला व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल होत आहे.

यात संगीतात बेधुंद झालेले श्रोते गायक आणि एकमेकांवर नोटांचा वर्षाव करत आहेत. या कार्यक्रमाला पोलिसांची परवानगी दिली की नाही याबाबत माहिती मिळू शकली नाही. मात्र हा व्हिडिओ विरारचाच आहे कि अन्य कुठला याचा शोध पोलीस घेत आहेत.

Scanned with CamScanner

दि. 06/03/2023

१२) पुण्यनगरी पृ. पान क्र. १

# प्रवेशाच्या नावाखाली ५० लाखांची फसवणूक

## मीरा रोड येथील घटना, आठ जणांवर गुन्हा दाखल

**मीरा रोड :** मीरा रोड येथे राहणाऱ्या मुलीला वैद्यकीय महाविद्यालयात व्यवस्थापक कोट्यातून प्रवेश मिळवून देतो, असे सांगून डॉक्टर दाम्पत्याकडून ५० लाख रुपये घेऊन वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश दिला नाही. त्यामुळे त्यांची फसवणूक केल्याप्रकरणी नयानगर पोलीस ठाण्यात ८ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मीरा रोडमधील नयानगर भागात अफसर व नझीर अन्सारी हे डॉक्टर दाम्पत्य त्यांच्या दोन मुलींसह राहतात. त्यांच्या लहान मुलीने नीटची परीक्षा पास झाल्यामुळे तिला वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी काही व्यक्तींनी फोन केले होते. किरण याने जुलै २०१९ मध्ये फोन करून तुमच्या मुलीला वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश पाहिजे असेल, तर मी मंत्रालयात बसतो तेव्हा मंत्रालयात भेटा सांगितले. अफसर या दोन दिवसांनी किरण याला भेटण्यासाठी मंत्रालयात गेल्या. त्यांची भेट झाली असता त्याने ५ वैद्यकीय महाविद्यालयांची नावे सांगून व्यवस्थापक कोट्यातून प्रवेश मिळेल, त्यासाठी ८० लाख ते १ कोटी रुपये लागतील, असे सांगितले. त्यानंतर किरण याने त्यांना ठाण्याला बोलावले असता, अफसर व नझीर हे गेले तेथे किरणसह त्याचा मित्र अखिलेश पाल होता. पाल याने तेरणा वैद्यकीय महाविद्यालयासाठी ९५ लाख, पुण्याच्या एमआयएमईआरसाठी ८० लाख, काशीबाई नवले महाविद्यालयासाठी ८५ लाख, नाशिकच्या वसंतराव पवार महाविद्यालयासाठी ९० लाख व मुंबईच्या के. जे. सोमय्यासाठी १ कोटी रुपये असे महाविद्यालयानुसार दर सांगितले.

त्यानंतर तेरणा मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेशासाठी ८० लाख रुपये देण्याचे ठरले. किरण निचिते, राकेश वर्मा, लव गुप्ता, राजू पाटील, गणेश, नीलेश व कश्यप यांनी अफसर व नझीर अन्सारी दाम्पत्याकडून थोडेथोडे करून ५० लाख रुपये घेतले. अफसर, यांच्याकडून प्रवेशासाठी अर्ज भरून घेतला व त्यासाठीचा धनादेश घेतला; परंतु कोणत्याही वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश करून दिला नाही. त्यामुळे अन्सारी दाम्पत्याने पैसे मागितले असता, पैसे परत देण्यास टाळाटाळ केली. पुन्हा तुमची मुलगी मुंबईत शिक्षण घेत आहे. तिला बघून घेऊ, अशी धमकी देऊ लागले. या दाम्पत्याला त्यांची फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी आरोपीविरोधात नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

CamScanner

Scanned with CamScanner

दि. 06/03/2023

13) पुढारी पान क्र. ४

# राज्यात अवघ्या १२.८४ टक्के 'लेडी सिंघम'

## पोलिस दलातील महिलांची संख्या ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्यास केंद्र शासन आग्रही

**छत्रपती संभाजीनगर : गणेश खेडकर**

पोलिस दलात महिलांचे प्रमाण ३३ टक्के करण्यासाठी मागील दहा वर्षांपासून केंद्र शासन राज्यांना सूचना देत आहे. मात्र, महाराष्ट्र सरकारकडून अद्याप या सूचनांची अंमलबजावणी झालेली नाही. राज्यात २ लाख ६ हजार ६५५ पोलिस आहेत. त्यात महिलांची संख्या केवळ २६ हजारांहून अधिक असून हे प्रमाण अवघे १२.८४ टक्के येते. राज्याच्या तुलनेत छत्रपती संभाजीनगर पोलिस आयुक्तालय आणि पोलिस अधीक्षक कार्यालयात हे प्रमाण जास्त आहे.

**महिला दिन विशेष**

महिलांवरील अत्याचाराच्या घटनांचा तपास करण्यासाठी महिला पोलिसांची संख्या अधिक असणे गरजेचे आहे, तेव्हा पीडित महिलांना न्याय देता येणे शक्य आहे.

प्रत्येक पोलिस ठाण्यात दोन महिला अधिकारी व आठहून अधिक महिला अंमलदारांची नेमणूक व्हायला पाहिजे. मात्र, अजूनही एका महिला अधिकाऱ्यावरच पोलिस ठाण्याचा भार असतो. अनेक ठिकाणी तर महिला अधिकारीही नसतात. त्यामुळे पीडित महिलांची कुचंबणा होते. ऐनवेळी दुसऱ्या ठाण्यातून महिला अधिकाऱ्यांना पाचारण करावे लागते. हे सर्व रोखण्यासाठी पोलिस दलात महिलांची संख्या वाढविणे गरजेचे आहे.

### शहरात १४.७५ टक्के महिला

छत्रपती संभाजीनगर शहर पोलिस आयुक्तालयात ३ हजार ५३९ पोलिस अंमलदारांची, तर तीन उपायुक्त, ८ सहायक आयुक्त, ३९ पोलिस निरीक्षक, ४१ सहायक निरीक्षक, १३७ उपनिरीक्षकांची पदे मंजूर आहेत. त्या तुलनेत येथे महिला अंमलदार व अधिकाऱ्यांची संख्या अतिशय कमी आहे. शहरात ५२२ महिला अंमलदार आहेत. हे प्रमाण १४.७५ टक्के एवढेच येते. महिला अधिकाऱ्यांची संख्या अवघी ३३ आहे. एक उपायुक्त, पाच निरीक्षक, ७ सहायक निरीक्षक आणि २० उपनिरीक्षक महिला अधिकारी आहेत.



### ग्रामीणमध्ये १५.७३ टक्के महिला

ग्रामीण पोलिस दलात १ हजार ९०५ पदे मंजूर आहेत. ३३ टक्के आरक्षणानुसार ६२८ महिला पोलिस असायला पाहिजेत. मात्र, २०८ पदे रिक्त असल्याने सध्या कार्यरत १ हजार ६९७ पोलिस अंमलदार हजर आहेत. त्यानुसार विचार केला तरी, ३३ टक्के आरक्षणानुसार ५६० महिला पोलिस असायला पाहिजेत. प्रत्यक्षात केवळ २६७ महिला पोलिस कार्यरत आहेत. कार्यरत पदांच्या केवळ १५.७३ टक्के एवढे हे प्रमाण आहे.

### सात कलमी कार्यक्रम कागदावरच

महिला पोलिस कर्मचाऱ्यांची संख्या वाढवणे, पीडित महिलांशी महिला पोलिसांनी संवाद साधणे, पोलिस चौक्यांमध्ये दर्शनी भागात महिला पोलिसांचे मोबाईल क्रमांक लिहून ठेवणे, महिला बचत गट, महिला संस्थांच्या नियमित बैठका घेणे, महिला दक्षता समित्यांचे पुनर्गठन करणे, तक्रार पेट्यांची संख्या वाढवणे अशाप्रकारच्या उपाययोजनांचा सात कलमी कार्यक्रम काही वर्षांपूर्वी हाती घेण्यात आला होता; पण यातील अनेक बाबी या कागदावरच आहेत.

CamScanner

Scanned with CamScanner

लोकमत

# नशेखोरांचा बाजार; कोटींचा माल जप्त

## नालासोपारा बनतेय ड्रग्स विक्रीचे प्रमुख केंद्र

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : गेल्या काही वर्षांत नालासोपारा हे ड्रग्स विक्रीचे प्रमुख केंद्र झाले असून, येथे उच्चभ्रू सोसायट्यांपासून ते झोपडपट्टीमध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणावर ड्रग्स खरेदी-विक्री केली जात असल्याचे समोर आले आहे. ड्रग्स माफियांवर कारवाई करण्यासाठी पोलिसांना फार मोठी कसरत करावी लागते. आतापर्यंत या शहरातून कोट्यवधी रुपयांचे ड्रग्स जप्त करून शेकडो आरोपींना तुरुंगात पाठवले आहे.

नालासोपाऱ्यात अनेक ठिकाणी ब्राऊन शुगर, गांजा, चरस विकणाऱ्या टोळ्या कार्यरत असून ते विकत घेण्यासाठी तरुण ठिकठिकाणाहून नालासोपाऱ्यात येतात. पोलिसांनी अनेक कारवाया केलेल्या असूनही यावर अंकुश लावण्यात त्यांना अपयश येत आहे, अशी चर्चा नागरिकांत आहे.

### काय आहे एनडीपीएस कायदा?

१९८५ मध्ये एनडीपीएस कायदा तयार करण्यात आला. यात ड्रग्ज आणि तस्करीसारख्या गुन्ह्यांविरोधात शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. या कायद्यातील अनेक तरतुदी ड्रग्जचं उत्पादन, विक्री, बाळगणे, सेवन, तस्करी अशा कृतींचा समावेश आहे. याला केवळ परवानगीने वैद्यकीय किंवा वैज्ञानिक कारणांसाठी वापर अपवाद ठेवण्यात आला आहे.




### वर्षभरात ८२५ प्रकरणांत कारवाई, ६४६ जणांना अटक

मीरा भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयात मागील वर्षभरात ८२५ अमली पदार्थांच्या कारवाया केल्या . यादरम्यान ६०९ पुरुष, १७ महिला आरोपी आणि २० परदेशी नागरिक असे ६४६ आरोपींना अटक केली आहे.

### कारवाईत विविध अमली पदार्थ जप्त

पोलिसांनी वर्षभरात केलेल्या कारवाईत १६८ किलो गांजा, ३ किलो ८५१ ग्रॅम चरस, ५० ग्रॅम अफीम, ३ किलो कोकेन, ३१ किलो एमडी, ८ किलो ब्राऊन शुगर असा कोटींचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच गॉंग सिरपच्या ८ हजार २०८ बॉटलदेखील जप्त केल्या आहेत.

### नायजेरियन नागरिकांची संख्या वाढतेय

नालासोपारा शहराच्या पूर्व, पश्चिम विभागातील दोन्ही पोलिस ठाण्याच्या हद्दीत नायजेरियन नागरिक मोठ्या संख्येने राहतात. तुळींज आणि नालासोपारा पोलिस ठाण्याअंतर्गत शेकडो नायजेरियन लोक राहत असल्याचे बोलले जात आहे. पोलिस प्रशासन यांच्यावर वेळीच कारवाई करत नसल्यामुळे यांची संख्या वाढत असल्याचीही चर्चा सामान्यांमध्ये आहे. जर वेळीच नायजेरियनविरोधात पोलिसांनी कडक कारवाई केली नाही तर भविष्यात हे पोलिसांसाठी डोकेदुखी ठरतील.

### दररोज कारवाई

पोलिस आयुक्तालयात दररोज अमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर, तसेच पिणाऱ्यांवरही कारवाई केली जात आहे.

- पोलिस प्रशासन



Scanned with CamScanner

लोकमत

## ठिकठिकाणी नाकाबंदी : फुगे, पिशव्या मारणाऱ्यांवर होणार कारवाई

# पालघर जिल्ह्यातील पोलिस होळी, धूलिवंदनासाठी अलर्ट

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** संपूर्ण भारतात साजऱ्या होणाऱ्या होळी आणि धूलिवंदनाच्या सणादरम्यान वसई तालुक्यासह पालघर जिल्ह्यामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी वसई-विरार मीरा भाईंदर आयुक्तालयातील पोलिस सज्ज झाले आहेत. मुली व महिलांवर फुगे,पिशव्या मारणाऱ्यांना अटक करून कडक कारवाई करणार आहे. याकरिता स्थानिक पोलिस बीटनुसार ३ ते ४ पथके आपल्या हद्दीत गस्तीसाठी ठेवणार आहेत, तर आपापल्या हद्दीत नाकाबंदीसुद्धा करणार असून ट्रिपल सीट, ड्रंक अँड ड्राइव्हच्या केसेस करण्याचे आदेश वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिले आहेत.

वसई तालुक्यातील शाळा आणि कॉलेजला सोमवारी होळीच्या दिवशी जाणाऱ्या मुलींना व रस्त्यावर ये-जा करणाऱ्या महिलांना त्रास देत रंगाचे फुगे आणि पिशव्या मारणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाणार आहे. तुळींज, विरार, पेल्हार आणि वालीव पोलिस ठाण्याच्या हद्दीत शाळा आणि कॉलेज यांची संख्याही जास्त आहे. त्यामुळे या प्रकारांवर लक्ष ठेवण्यासाठी सिव्हिल वर्दीमध्ये पोलिस गस्त घालणार असून असे गैरप्रकार आढळल्यास कडक कारवाई करणार आहेत. सणाच्या दिवशी संपूर्ण दिवसभर नाकाबंदी लावणार असून मद्य पिऊन गाड्या चालवणाऱ्यांवरही कारवाई होणार आहे.

अर्नाळा सागरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत अर्नाळा, कळंब आणि राजोडी हे तीन बीच येत असून रंगपंचमीच्या दिवशी समुद्रकिनारी हजारोंच्या संख्येने स्थानिक व पर्यटक अंघोळीसाठी व मौजमजेसाठी येतात. येथे अनुचित प्रकार घडू नये या उद्देशाने किनारी पहारा ठेवून बोट पेट्रोलिंग करणार आहेत. तसेच जिल्ह्यातील विविध तालुक्यात पोलिसांची गस्त दोन दिवस कडक राहणार आहे.



मीरा-भाईंदर वसई विरार शहरात सार्वजनिक ६४५ होळी व खाजगी १४१६ होलिकांचे दहन होणार आहे. या संपूर्ण सण उत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरिता पोलिस दल सतर्क आहे. पुढेही अनुचित प्रकार घडू नये याची दक्षता घेतली जाणार. **- पोलिस प्रशासन**

## होळीसाठी मजूर परतले गावाला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कासा :** डहाणू तालुक्यातील अनेक आदिवासी मजूर रोजगारासाठी बाहेरगावी, परजिल्ह्यात जात असतात. हे मजूर होळीनिमित्त गावात पुन्हा परतले आहेत. दरम्यान, कासा, चारोटी येथे होळीच्या खरेदीसाठी बाजारपेठा सजल्या असून नागरिकांनी गर्दी केलेली दिसून आली.

होळीसाठी विविध प्रकारच्या वस्तू खरेदी करण्यासाठी नागरिक कासा आणि चारोटी बाजारपेठेत गर्दी करत होते. कासा भागातील नागरिक मोठ्या प्रमाणावर बाहेरगावी व शहराकडे वीट व्यवसाय, बांधकाम आदी कामासाठी जातात. ते आता सण साजरा करण्यासाठी गावाकडे आले असून सणासुदीला वस्तू खरेदीसाठी त्यांनी शनिवारपासून गर्दी करण्यास सुरुवात केली आहे.



Scanned with CamScanner

लोकमत

# २८० रुपयांसाठी दगड डोक्यात घालून मित्राचा खून

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : तुळींज ओव्हरब्रीजच्या खाली २५ फेब्रुवारीच्या रात्री सिमेंटचा दगड डोक्यात घालून मित्राची हत्या करणाऱ्या आरोपी मित्राला तुळींजच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीने ही हत्या फक्त २८० रुपयांसाठी केली आहे.

नायगाव येथे राहणाऱ्या आरोपी दीपक गुप्ता ऊर्फ बटला (२०) आणि मृत पप्पू (अंदाजे ३५ ते ४० वर्षे) या दोघांनी कॅटर्सचे काम केले होते. मिळालेल्या पैशातून समान वाटणी करून दोघे दारू प्यायले. पण पप्पूने तब्येत बरी नसल्याने डॉक्टरकडे औषध घेण्यासाठी जातो असे बोलून आरोपी दीपककडून २८० रुपये घेतले. पण पप्पू त्याच पैशाने दारू प्यायला व विवस्त्र फिरू लागल्याने आरोपीने त्याला समजवण्याचा प्रयत्न केला. पप्पूने त्याच्या कानाखाली मारली. त्यामुळे रागाच्या भरात दीपकने त्याच्या डोक्यात दगड घातला.

Mumbai Main
Page No. 7 Mar 06, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

# पेट्रोल बॉम्बप्रकरण; दोन आरोपी फरारच

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** विरार येथील आयर्नमॅन हार्दिक पाटील यांच्या बंगल्यावर ४ मे २०२१ रोजी झालेल्या पेट्रोल बॉम्ब हल्ल्याप्रकरणी अद्याप दोन आरोपी फरार असल्याचे वसई न्यायालयात विरार पोलिसांनी सांगितले आहे, तर आतापर्यंत आठ आरोपींना विरार पोलिसांनी अटक केली आहे. फरार दोन्ही आरोपींना पोलिस केव्हा अटक करणार याकडे वसईकरांचे लक्ष आहे.

आयर्नमॅन हार्दिक पाटील यांच्या निवासस्थानावर दि. ४ मे २०२१ रोजी पेट्रोल बॉम्बचा मारा करण्यात आला होता. विरार पोलिसांनी याप्रकरणी जीवे ठार मारण्याचा प्रयत्न, कट-कारस्थान रचणे या कलमान्वये ६ मे रोजी गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी आतापर्यंत आठ आरोपींना अटक केली असून, यातील सनी ठाकूर आणि शैलेश खोपडे हे दोन आरोपी फरार असल्याचे वसई न्यायालयाला तपास अधिकारी आणि पोलिस उपनिरीक्षक संदेश राणे यांनी गुरुवारी निर्दशनास आणून दिले आहे.

कांचन ठाकूरला कोर्टाने अंतरिम जामीन दिला होता, पण तो फेटाळल्याने त्याला दि. २३ फेब्रुवारीला अटक करण्यात आली होती. पहिली सहा व दुसरी दोन दिवसांची कांचन ठाकूरची पोलिस कोठडी संपल्यावर गुरुवारी न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. गुन्ह्यातील फरार दोन्ही आरोपींना लवकरात लवकर अटक करण्याची मागणी हार्दिक पाटील यांनी केली आहे.

Hello Vasai
Page No. 2 Mar 06, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

# Booked under stringent organised crime Act, man held from MP after 5 yrs

SURESH GOLANI / Mira-Bhayandar

The Central Crime Branch unit of the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police nabbed a criminal on the run for the last five years after being booked under the stringent Maharashtra Control of Organised Crime Act (MCOCA), 1999.

Rakesh Singh Rajawat alias Kushwaha, 48, was arrested from Pandri village in Bhind district of Madhya Pradesh by a team led by Assistant Police Inspector Dattaray Sarak on Friday.

Kushwaha and his accomplices had waylaid a trailer truck near the Khaniwade toll plaza on the Mumbai-Ahmedabad Highway on Sept 3, 2018. The gang mounted an assault on the driver and cleaner of the truck and decamped with the vehicle laden with 29 tonnes of copper wire worth more than Rs1.63 crore. While some of his accomplices were arrested, Kushwaha had managed to evade the police dragnet.

**The man had waylaid a truck near Khaniwade toll plaza in September 2018. While his accomplices were caught, he fled and was on the run ever since**

Officials from the Central Crime Branch were asked to investigate the case. Based on electronic surveillance and informer input, the police arrested Kushwaha from his village on Friday. "Apart from his involvement in cases of dacoities and other criminal activities, he was also booked under relevant sections of the Indian Penal Code and the stringent MCOCA in 2019." said Police Inspector Rahul Raakh. Further investigations are underway.

# Bldrs, architect booked 8 mths after toddler's death at building site

SURESH GOLANI / Mira-Bhayandar

Nearly eight months after a two-year-old girl drowned in a water tank at an under-construction building site in Bhayandar, the police have registered an offence of negligence against four people, including the land owner, builder and architect. However, no arrests have been made so far in the case.

The tragic mishap was reported from a construction site in Rai village near Bhayandar on Aug 6, 2022. The child, Ritu Deepak Sonar, had mysteriously disappeared while playing. Her body was later recovered from an underground water tank. She had apparently slipped into the partly covered tank built at the ground level.

**The child had mysteriously disappeared while playing. Her body was later recovered from an underground water tank**

Initially, an accidental death report was registered at the Bhayandar police station. The grief-stricken family members, however, alleged negligence on the part of the construction company for not covering the tank.

Refusing to comment on the issue, Assistant Commissioner of Police Shantilal Jadhav said to contact the senior police inspector. When asked about the delay, Senior Police Inspector MP Patil said, "After examining the on-site safety measures, the process of verifying the ownership title with the municipal corporation took more time. Moreover, the suspects did not cooperate in the probe."

The accused have been identified as Pritesh Ramesh Cheddha, Nimesh Shashikant Thakkar, Sandip Mohan Patil (all builders) and the architect, Basav Raj. One of the builders is said to be an influential political leader and former municipal corporator of the area.






Scanned with CamScanner

MHT
मुंबई हिंदमाता टाइम्स
राष्ट्रीय हिन्दी दैनिक
मुंबई, रविवार 05 मार्च 2023

## एमबीवीवी मध्यवर्ती क्राइम ब्रांच को सफलता

# 6 सालों से फरार अपराधी मध्यप्रदेश राज्य से गिरफ्तार



**वसई ;** डकैती समेत मोक्का मामले में 6 साल से वांछित आरोपी को मध्यवर्ती अपराध जांच शाखा की टीम ने मध्यप्रदेश राज्य से गिरफ्तार करने में सफलता पाई है। यह कार्रवाई क्राइम डीसीपी अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में मध्यवर्ती अपराध जांच शाखा पीआई राहुल राख की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने शनिवार को दी है। पुलिस ने बताया कि 3 सितंबर 2018 को शिकायतकर्ता सैतानलाल हरदेव गूजर रात्रि तलोजा से जयपुर मार्ग से 29 टन कॉपर अपने कब्जे में ट्रेलर वाहन क्र.आरजे 9-जीवी 2848 से जा रहा था,तभी रात करीब 11.30 बजे आरोपी शख्स ने अपनी निजी कार खानीवड़े टोल बूथ के सामने ट्रेलर के सामने खड़ी कर दी,शिकायतकर्ता व क्लीनर को उतार दिया और अपने निजी वाहन में जबरन बिठाया गया तथा चिबीपाडा,भिवंडी, चिंचोटी और वापस भिवंडी फिर धुमालनगर और फिर वसई में उतार दिया, आरोपियों ने आपस में मिलीभगत कर जबरन ट्रेलर गाड़ी, 29 टन तांबा व उसका मोबाइल फोन कुल 012, 63, 09, 611 रुपये की चोरी कर फरार हो गए.इस मामले में विरार थाने में कलम 495,363,120 (ब) व अन्य धाराओं के तहत केस दर्ज किया गया था। पुलिस ने बताया कि उक्त अपराध में वांछित अभियुक्तों की तलाश एवं गिरफ्तारी के संबंध में वरिष्ठ अधिकारियों द्वारा दिये गये निर्देश एवं मार्गदर्शन के अनुसार मध्यवर्ती अपराध शाखा के अधिकारियों एवं कर्मचारी ने पाया कि उपरोक्त दर्ज अपराध में नामजद आरोपी राकेश सिंह उदयसिंह राजावत कुशवाहा है,जो पिछले 6 साल से वांछित आरोपी है। पुलिस ने कहा कि तदनुसार सहा पुलिस निरीक्षक दत्तात्रेय सरक ने गुप्त मुखबिरों एवं तकनीकी गुप्तचर के माध्यम से प्राप्त सूचना के आधार पर आरोपी राकेश सिंह उदयसिंह राजावत उर्फ कुशवाह (48),निवासी-बी.टी. आय रोड, महावीर नगर,ग्राम पांढरी, पो. स्ट.उमरी,जिला भिंड, राज्य मध्यप्रदेश स्थित जाल बिछाकर 3 मार्च को हिरासत में लिया।आरोपी की जब कुशल जांच की गई तो पता चला कि उक्त अपराध में शामिल पाया गया,अपराध इससे पहले गिरफ्तार आरोपियों के खिलाफ मोक्का कानून के तहत कार्रवाई की गई थी,और उसका मोक्का कोर्ट केस नंबर 03/2019 है। विरार थाना पुलिस उक्त अपराध की आगे की जांच कर रही है।

Scanned with CamScanner

# Bldrs, architect booked 8 mths after toddler's death at building site

SURESH GOLANI / Mira-Bhayandar

Nearly eight months after a two-year-old girl drowned in a water tank at an under-construction building site in Bhayandar, the police have registered an offence of negligence against four people, including the land owner, builder and architect. However, no arrests have been made so far in the case.

The tragic mishap was reported from a construction site in Rai village near Bhayandar on Aug 6, 2022. The child, Ritu Deepak Sonar, had mysteriously disappeared while playing. Her body was later recovered from an underground water tank. She had apparently slipped into the partly covered tank built at the ground level.

**The child had mysteriously disappeared while playing. Her body was later recovered from an underground water tank**

Initially, an accidental death report was registered at the Bhayandar police station. The grief-stricken family members, however, alleged negligence on the part of the construction company for not covering the tank.

Refusing to comment on the issue, Assistant Commissioner of Police Shantilal Jadhav said to contact the senior police inspector. When asked about the delay, Senior Police Inspector MP Patil said, "After examining the on-site safety measures, the process of verifying the ownership title with the municipal corporation took more time. Moreover, the suspects did not cooperate in the probe."

The accused have been identified as Pritesh Ramesh Cheddha, Nimesh Shashikant Thakkar, Sandip Mohan Patil (all builders) and the architect, Basav Raj. One of the builders is said to be an influential political leader and former municipal corporator of the area.

Scanned with CamScanner

लोकमत

# मोक्का लागलेल्या दरोड्यातील फरार आरोपीला मध्यप्रदेशातून अटक

## मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने केली कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरार पोलिस ठाणे हद्दीतील दरोडा, मोक्क्याच्या गुन्ह्यातील सहा वर्षांपासून फरार आरोपीला मध्य प्रदेशातून गुरुवारी मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी अटक केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी विशाल धायगुडे यांनी दिली आहे.

३ सप्टेंबर २०१८ मध्ये फिर्यादी चालक सैतानलाल हरदेव गुजर हे रात्री तळोजा ते जयपूरमार्गे २१ टन कॉपर ट्रेलरमधून घेऊन जात होते. रात्रीच्या सुमारास खानिवडे टोलनाक्याचे पूर्वी आरोपींनी त्यांच्याकडील गाड्या ट्रेलरसमोर लावून चालक व क्लिनर यांना खाली उतरवून जबरदस्तीने खासगी वाहनामध्ये बसविले. त्यांना फिरवून नंतर वसई येथे उतरविले होते. चालकाच्या ट्रेलरमधून २१ टन कॉपर व त्यांचा मोबाइल असा १ करोड ६३ लाख १ हजार ६११ रुपयांचा मुद्देमाल आरोपींनी दरोडा घालून जबरदस्तीने चोरला होता.

या गुन्ह्यामधील आरोपी राकेशसिंह उदयसिंह राजवत कुशवाह (४८) हा गेल्या सहा वर्षांपासून फरार होता. त्यानुसार सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रय सरक यांनी या आरोपींबाबत बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाद्वारे त्याला मध्य प्रदेशातून सापळा लावून गुरुवारी अटक केली. त्याचा या गुन्ह्यात सहभाग असल्याचे निषन्न झाले. या गुन्ह्यातील पूर्वी अटक आरोपीविरुद्ध मोक्का कायद्यांतर्गत कारवाई केली असून, विरार पोलिस तपास करीत आहेत.

### सापळा रचून अटक

- हो कामगिरी पोलिस उपआयुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहा.पोलिस आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलिस निरीक्षक राहुल राख, सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रय सरक, पोलिस हवालदार शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, महेश वेल्हे, हनुमंत सुर्यवंशी तसेच सहायक फौजदार संतोष चव्हाण यांनी केली आहे.



Hello Vasai
Page No. 1 Mar 05, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner